आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)

# बढतीमधील आरक्षण आणि गोंधळाची स्थिती

मागासवर्गीय कर्मचारी अधिकाऱ्यांना बढती मधील आरक्षणाचा सर्वोच्च न्यायालयाच्या एम. नागराजन प्रकरणी आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या विजय घोगरे महाराष्ट्र प्रकरणी बढती मधील आरक्षणाला रोख वर लावलीच आहे: परंतु गेल्या दहा वर्षामध्ये कर्मचारी अधिकाऱ्यांना मिळालेल्या बढत्या रद्द करून त्यांना पदावनत करण्यात यावे असे मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिले आहे आणि सर्वोच्च न्यायालयाकडे अपिल करण्यासाठी तीन महिन्याचा अवधी दिला आहे त्यातील दिड महिना निघुन गेला आहे, आणि आता केवळ सहा आठवडे उरले आहेत. न्यायालयाच्या निर्णयामुळे सर्वत्र गोंधळाची परस्थिती निर्माण झाली असुन केवळ महाराष्ट्र नव्हे तर मध्यप्रदेश , राजस्थान, कर्नाटक, आणि उत्तर प्रदेश मध्ये सुध्दा हजारोंने कर्मचारी पदावनत करण्यात आल्यामुळे सर्वत्र चिंतेचे वातावरण असुन हळुहळु संविधानात तरतूद करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जे नोकरी आणि शिक्षणामध्ये आरक्षण दिले होते, ते हळुहळु काढुन घेतील कि काय ? अशी शंकेची पाल प्रत्येक मागासवर्गीय घटकामध्ये निर्माण झालेली आहे

## राज्यसरकारने करावयाची कार्यवाही

राज्यशासनाने या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात ठासुन सांगावे लागेल कि आरक्षण हे साबरवाल प्रकरणी निघालेल्या जी. आर. प्रमाणे ५० टक्के च्या वर जात नाही / क्रिमीलेअरची संकल्पना राज्यात राबवल्या जात आहेत ! मागासलेपणाच्या बाबतीत एस.सी. व एस.टी. हे मागासच आहेत हे सुर्य प्रकाशा एवढे सत्य आहे. घटनेच्या तरतुदी प्रमाणे ते मागासच आहेत, हे वेगळे



Email : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com
मुंबई : [illegible] 25686679 [illegible] 09868180458, 09920718009
[illegible] - 07232-256333, 256010

सिध्द करण्याची आवश्यकता दिसत नाही. भटके, विमुक्त तर एस.सी.एस.टी पेक्षाही जास्त मागास आहेत. त्यांचा सुध्दा इदाते समीती आणि रेणके आयोगाने तसेच २०११ च्या आर्थिक आणि सामाजिक तसेच जात निहाय जनगणनेच्या कादयानुसार हा सर्व घटक वंचीत आणि अत्यंत मागासच आहे.

## बढती मधील आरक्षण बंद झाल्यास तोच अर्थ भरती मध्ये लावल्या जाईल

भीती अशी निर्माण होत आहे की, न्यायालयाच्या माध्यमातुन जर हे सरकार चालत असेल, आणि संवीधानामध्ये तातडीने दुरुस्ती करण्याचे टाळत असेल, तर हाच नियम आणि निकष मागासवर्गीयांच्या भरती प्रकरणी लागु शकतो, त्यामुळे संपुर्ण आरक्षण बंद करावे लागेल. एम. नागराजन प्रकरणी अनेक प्रश्न उपस्थित होतात. या बढतीच्या आरक्षणा प्रकरणी त्या मागासवर्गीय अधिकाऱ्यांचा काय दोष ? संवीधानाच्या या संदर्भाच्या तरतुदी प्रमाणे म्हणजेच कलम १६ (४ ब ) अनुसार त्यांना बढती दिली. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सहानी प्रकरणी निकाल देताना आरक्षण हे ५० टक्के च्या वर जाता कामा नये अशी अट घातली; तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या साबरवाल प्रकरणी बढतीमध्ये आरक्षण देताना जर विहीत टक्केवारी भरती असेल तर प्रमोशन साठी आरक्षण देता येत नाही.

## सर्वोच्च न्यायालयाचे निष्कर्ष

एम नागराजन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने आपले निष्कर्ष काढताना काय म्हटले ते बघने आवश्यक आहे. निष्कर्षात म्हटले आहे की, "ज्या संदर्भित घटना दुरुस्तीद्वारा घटनेमध्ये कलम १६ ( ४ अ ) व १६ ( ४ ब) घातले गेले आहेत, ती घटना दुरुस्ती घटनेच्या कलम १६ ( ४) मधूनचे उत्पन्न झाली आहे. घटनेच्या कलम ३३५ या अंतर्गत राज्या शासनाची

कार्यक्षमता ध्यानात घेऊन राज्य शासनाला ज्या घटकांमुळे आरक्षणाची तरतुद करता येते ते घटक किंवा कारणे या घटना दुरुस्तीमुळे कायम रहाते. कारणे किंवा घटक म्हणजे मागासलेपणा व पुरेसे प्रतिनिधीत्व नसणे. ज्या संदर्भित घटना दुरुस्तीद्वारा घटनेत सदर १६ (४ आ) व १६ (४ ब) घातले गेले आहेत ती घटना दुरुस्ती घटनेच्या कलम १६ (४) ची संरचना बदलत नाही. सदर संदर्भित घटना दुरुस्त्या फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती पुरत्याच मर्यादित आहेत. त्यामुळे घटनेची कोणतीही प्रावधाने नाश पावत नाहीत किंवा लोप पावत नाहीत जसे संख्यात्मक मर्यादा जास्तीत जास्त ५० टक्के असणे, क्रीमीलेअर ची कल्पना ( गुणात्मक मर्यादा ). इंद्रा साहानी या खटल्यामध्ये निर्णय दिल्याप्रमाणे एका बाजुला अन्य मागासवर्गीयांमध्ये उप वर्गीकरण व दुसऱ्या बाजूला अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे उप वर्गीकरण, आर.के. सबरवाल या खटल्यामध्ये पदांवर आधारीत रोस्टर व त्यातच अदलाबदलीची कल्पना अंतर्भूत असणे.

आम्ही असे पुन्हा सांगतो की ५० टक्के ची मर्यादा, क्रीमीलेअरची संकल्पना, तसेच मागासलेपण, पुरेसे प्रतिनिधित्व नसणे व प्रशासकीय कार्यक्षमता या महत्वाच्या गोष्टी घटनात्मक दृष्टया आवश्यक आहेत आणि त्यांविना घटनेच्या कलम १६ च्या संधीमध्ये समानता असण्याचे मूलभूत रचनाच कोलमडून जाईल.

तथापि वर सांगितल्यानुसार मुख्य मुद्दा आरक्षण किती असावे हा आहे. संबंधित राज्यांनी आरक्षणाची तरतुद करताना आरक्षण करणे भाग पाडणाऱ्या घटकांचे अस्तित्व जसे मागासलेपणा, पुरेसे प्रतिनिधित्व नसणे व एकंदरीत प्रशासकीय कार्यक्षमता यांचे पुरेसे अस्तित्व असल्याचे सिध्द केले पाहिजे. वर दिल्याप्रमाणे संदर्भित तरतूद ही अधिकार देणारी तरतूद आहे.

पदोन्नतीमध्ये अनुसूचित जाती/ जमातींना आरक्षण देण्यास सरकार बांधिल नाही. तथापि जर सरकारला आपले तारतम्य वापरून अशी तरतूद करायची असेल तर त्या राज्याला एखाद्या वर्गाचा मागासलेपणा व पुरेसे प्रतिनिधित्व नसणे सिध्द करणारी आकडेवारी गोळा करावी लागेल, तसेच घटनेचे कलम ३३५ ची पूर्तता करावी लागेल. त्याचप्रमाणे जरी राज्याला आरक्षण करण्यासाठी भाग पाडणारे घटक असेल, तरी आरक्षण केल्यामुळे एकंदरीत घालून दिलेल्या ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेचे उल्लंघन होत नाही ना किंवा क्रीमीलेअरच्या लोप होत नाही ना किंवा आरक्षण अमर्याद रीत्या वाढत नाही याची काळजी घ्यावी लागेल. उपरोक्त कथनाच्या अधिन राहून आम्ही घटना ( ७७ वी दुरुस्ती ) अधिनियम १९९५, घटना ( ८२ वी दुरुस्ती ) अधिनियम २००० व घटना ( ८५ वी दुरुस्ती ) अधिनियम २००१ हे घटनात्मक दृष्ट्या वैध आहेत असा निर्णय देतो.

आम्ही संदर्भित राज्यांचे वेगवेगळया कायद्यांच्या वैधतेचा अभ्यास केला नाही. आम्ही या मामल्यामध्ये घालून दिलेल्या कायद्यानुसार त्या त्या खंडपीठापुढे सादर केलेल्या याचिकामध्ये सदर प्रश्नाचा अभ्यास होईल."

## राज्य शासनाने स्वतःचे व न्यायालयाचे समाधान करावे

वरील प्रमाणे निष्कर्ष काळजी पुर्वक अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होत की राज्यांनी पुढील बाबींचा अभ्यास करुन स्वतःचे समाधान करावे कि ५० टक्केची मर्यादा, क्रिमीलेअरची संकल्पना , तसेच मागासलेपण, प्रशासनामध्ये पुरेसे प्रतिनिधीत्व नसेन व प्रशासकीय कार्यक्षमता बाधीत होणार नाही हे बघावे लागेल, स्वतःचे समाधान होईल याची निश्चीती करावी लागेल. आणि न्यायालयाला सादर करुन त्यांचेही समाधान करावे लागेल.

# भितीचे वातावरण

आता मागासवर्गीयामध्ये भिती अशी निर्माण झाली आहे की.केंद्रात व राज्यात भाजप सरकार असल्यामुळे मागासवर्गीयाचे आरक्षण बंद होणार की काय ? मागील आठवड्यात उत्तर प्रदेशातील पंधरा हजार पेक्षा जास्त कर्मचारी अधिका-यांना पदावनत करण्यात आले. ६ महिन्यापुर्वी मध्य प्रदेशात सुध्दा पाच हजार पेक्षा जास्त कर्मचारी अधिका-यांना पदावनत करण्यात आले. दिड महिन्यानंतर तोच धागा पकडून महाराष्ट्रातील जवळपास २५ हजार कर्मचा-यांना पदावन्नत करावे लागेल. आता प्रश्न असा निर्माण होतो की. "हे राज्य व्हावे हिंदु-राष्ट" आणि संवीधानामध्ये बदल करण्याचे जे वारंवार सुतोवाच भाजप आणि आरएसएस कडुन होत असते. ही जी भाजपची संकल्पणा आहे. त्या अनुरुप आदिवासी भटके विमुक्त या हिंदु जनांची रक्षा जर सरकार करु शकणार नसेल, तर हा घटक हिंदु म्हणूण कसा राहील ? यानांही आपला वेगळा विचार करुन "उपहिंदु " असे परिवर्तन करावे लागेल.

हरिभाऊ राठोड,

आमदार आणि माजी खासदार

११/०७/१७७५